(आजोबा) आबू

13 फेब्रुवारीला पहाटे 4 वाजता फोन वाजले. आईला बाबांचा फोन होता. अचानक फोन आल्यामुळे मी जागी
झाले होते. मी आईजवळच झोपले होते. मोठा आघात झाला होता. आमचे आबू आम्हाला सोडून गेले होते. बाबा
भुवनेश्वरला न येता मुंबईला परतले होते. मी अगदी सुन्न होऊन गेले. आईचे सांत्वन करू की माझे दुःख तिला सांगू. मला काहीच समजेना. आबूंच्यासाठीचे माझे सगळे मनोरथ कोसळून पडले होते. मी सगळयां नातवंडात लहान होते. माझे खूप लाड करायचे. गोष्टी सांगायचे महाभारत रामायण हयांच्यातल्या. फिरायला न्यायचे मंदिरात मला घेऊन जायचे. आता आबू आले की तो पर्यंत माझी परीक्षा संपलेली असेल असे वाटले. तेव्हा जगन्नाथपुरी, नंदनकानन वगैरे त्यांना घेऊन गाडीतून फिरून येऊ. रोज त्यांना घेऊन राममंदिरात जाईन फॉरेस्ट पार्कमध्यें जाईन असे बेत केले होते. लिंगराज मंदिरात पण जायचे होते. सगळे मनांतले मांडे मनातच राहिले. आबू गेले असे कळले तेव्हा तर माझी बोलतीच बंद झाली. पुण्याला जाऊन आबूंचा सर्व वृतान्त ऐकेपर्यंत मी एक अक्षर सुध्दा बोलले नाही. विमानांत सुध्दा डोळे गळतच होते. आम्ही पोचलो तेव्हा आबूंचे पार्थिव नेलेले होते व मुंबईचे नातेवाईक मुंबईला परत गेले होते. नाशिकचे विधी उरकल्यावर परीक्षा असल्यामुळे मी व आई लगेचच भुवनेश्वरला आलो. दुस-या दिवशी शिवरात्र व नंतर अमावास्या असल्यामुळे उदकशांत करून नंतर बाबा (आजीला) मॉमला घेऊन भुवनेश्वरला आले. अर्थात् विमानाने. आजी सिनिअर सिटिझन आहे शिवाय भाडी पण विमान कंपन्यानी कमी केली आहेत. मी अभ्यासाला लागले आहे. परीक्षा जवळ आली आहे होय ना. आता 12 वीचे वर्ष संपेपर्यंत (आजी) मॉम आमच्या कडेच रहाणार.

---------------------------------------------------------------